श्री राम चंद्र मिशन
ECHOES इंडिया वार्तापत्र

# गुरुदेवांच्या बातम्या



## एप्रिल २०१५

### गुजरातचा दौरा

सोमवार दि. २० एप्रिल रोजी दुपारी पूज्य कमलेशभाईंचे **अहमदाबाद** येथे आगमन झाले. विमानतळावरून त्यांनी आपल्या निवासस्थानाकडे प्रस्थान केले. अडालज योगाश्रम येथे जमलेल्या सुमारे ६०० अभ्यासींकरीता कमलेशभाईंनी सत्संग संचालित केला. त्यानंतर त्यांनी अभ्यासींची भेट घेतली.

दि. २१ रोजी गुरुदेवांनी सकाळी ६.३० वाजता सत्संगाचे संचालन केले. त्यानंतर ओघवत्या व सरळ सोप्या भाषेमध्ये हृदयस्पर्शी असे भाषण दिले. आध्यात्मिक विश्वामधील विशेष माहित नसलेल्या काही गोष्टी त्यांनी उघड केल्या. त्यांच्या भाषणातील ठळक मुद्दे :–

- गुरु व शिष्यामधील नात्याचे विश्लेषण करताना ते म्हणाले की गुरुदेव आपल्या शिष्याला सात महिन्यांसाठी आपल्या 'मानस'मध्ये ठेवतात व तद्नंतर ब्राईटर वर्ल्डमध्ये पोहोचवतात. जर शिष्याने उत्साहपूर्वक साधनेच्या सर्व अंगाचे अनुसरण केले असेल, तसेच गुरुंच्या प्रति खऱ्या प्रेमाशिवाय दुसरे काहीही स्वत:जवळ ठेवले नसेल तरच हे पोहोचवणे शक्य होते. बऱ्याच वेळा एखाद्या क्षुल्लक कृतीमुळे शिष्य स्वत:ला गुरुच्या 'मानस' मधून ओढून बाहेर काढतो.
- तुमच्या आतमध्ये असलेले दिव्य प्रेम सर्वांना बरोबरीने, एकसारखेपणाने जाणवले पाहिजे.
- पूजेनंतर जी स्थिती साधकाला बहाल केली गेलेली असते ती अभंग राखणे हे साधकापुढील सर्वात मोठे आव्हान आहे.

भाषणानंतर त्यांनी आपल्या निवासस्थानाकडे प्रस्थान केले व सायंकाळी ७ वाजता आपापल्या घरी सत्संगाकरीता ध्यानामध्ये बसावे असे सांगितले. बुधवारी नवजीवन एक्स्प्रेस या रेल्वेगाडीने ते सुरतकरीता रवाना झाले.

दि. २२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता कमलेशभाईंचे सुरत येथे आगमन झाले व ते एका अभ्यासी बंधूंच्या घरी गेले. दुपारी दोनच्या सुमारास सुरत येथील नव्या ध्यानगृहाच्या कागदपत्रांवर त्यांनी स्वाक्षरी केली. संध्याकाळी ५ वाजता नवीन ध्यानगृहाच्या जागेवर त्यांनी सत्संग संचालित केला. दक्षिण गुजरातमधील अनेक केंद्रांतून सुमारे ३०० अभ्यासी यावेळी उपस्थित होते. सत्संगानंतर त्यांनी उपस्थितांना थोडक्यात संबोधित केले. प्रदीर्घ अशा प्रतीक्षेनंतर सुरत येथे ध्यानगृहाची उभारणी होत असल्याने त्यांनी आनंद व्यक्त केला.हे ध्यानगृह सोयी–सुविधांनी परिपूर्ण असे बनवावे असे आवाहन त्यांनी अभ्यासींना केले. याच्या उद्घाटनासाठी सुरतला परत येण्याची मी उत्सुकतेने वाट पाहात आहे असे ते पुढे म्हणाले. सायंकाळी ६.३० वाजता ते भरुचकडे रवाना झाले.

दि.२३ रोजी सकाळच्या ७:३० च्या सत्संगानंतर त्यांना अतिशय आवश्यक असलेली अशी विश्रांती त्यांनी घेतली. दुपारी ११:३० वाजता बडोद्याला जाण्यास निघण्यापूर्वी ते सर्व अभ्यासींना भेटले.



दुपारी सुमारे १:०० वाजता कमलेशभाई बडोद्याला पोहोचले. सत्संगानंतर त्यांनी एक छोटे भाषण दिले. सत्संगादरम्यान झालेल्या कृपावर्षावाने त्यांना आनंद झाल्याचे त्यांनी सांगितले. त्या रात्री १०:३० वाजता व दुसऱ्या दिवशी सकाळी ६:३० वाजता अशा दोन सत्संगांची घोषणा त्यांनी केली. या सत्संगासाठी



त्यांनी अभ्यासींना त्यांच्या घरीच ध्यानास बसण्यास सांगितले.

सत्संगानंतर कमलेशभाई यांनी एका अतिथीसोबत आश्रमाचा फेरफटका मारला. ते अतिथी विविध आश्रमांसाठी वापरायच्या सौरऊर्जेवरील उपकरणांबद्दल माहिती देत होते. तसेच ते निसर्गाच्या विविध पैलूंविषयीदेखील बोलत होते. जुन्या ध्यानगृहामध्ये अतिथींसाठी व अभ्यासींसाठी कमलेश भाईंनी रिलॅक्सेशन टेक्निक (Relaxation Technique) संचालित केले. त्यानंतर ते त्यांची वाट पाहत असलेल्या मुलांना भेटले. सौर ऊर्जेचे उदाहरण देत ते उपचार पद्धतींबद्दल बोलले. कुटीराकडे जाताना वाटेमध्ये त्यांनी बऱ्याच अनेक अभ्यासींना अभिवादन केले.

त्या रात्री त्यांनी तेथेच मुक्काम केला व त्या दरम्यान त्यांनी मिशनसंबंधीचे काही काम केले. शुक्रवारी सकाळी ते **अहमदाबाद** कडे रवाना झाले.

दि २४ रोजी सायंकाळी उशीरा त्यांनी नऊ प्रशिक्षक प्रशिक्षणार्थींना सिटींगसाठी स्वतःच्या घरी बोलाविले. दि. २५ रोजी २ सिटींग्स देऊन त्यांना प्रशिक्षक म्हणून काम करण्यास परवानगी दिली. भंडाऱ्याआधी भारताच्या पश्चिम भागाला दिलेली ही बोनस भेट पूर्ण करून त्या सायंकाळी ते हैद्राबादकडे रवाना झाले.

## हैद्राबाद

बाबूजी महाराजांची एक नेत्रदीपक समाधी शहाजहांपूर येथे बनविण्याचा एक खास प्रकल्प आपल्या आवडत्या चारीजी महाराजांसाठी अतिशय प्रिय असा होता. तेथे जागेची कमतरता हीच एक अडचण होती. हैद्राबादच्या कान्हा प्रकल्पाच्या उपार्जनानंतर त्यांच्या प्राणप्रिय गुरुदेवांच्या अतुलनीय अशा समाधीसाठी त्यांनी ही जागा निवडली.

त्यानंतर कान्हा प्रकल्पामध्ये, बाबूजींनी तयार केलेल्या नवीन संस्कृतीचे द्योतक असणाऱ्या इमारतीवर एका भव्य पुतळा उभारण्याची योजना बनविण्यात आली. ही इमारत हृदयाकृति अगम्य चिन्हाच्या आकारामध्ये बनविली गेली आहे व ती हैद्राबाद मध्ये येणाऱ्या–जाणाऱ्या विमानांमधून दिसू शकते. भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या मर्यादेप्रमाणे याची एकूण उंची ५२ फूटांइतकी सिमित केली गेली आहे. या कालावधीमध्ये हे स्पष्ट झाले आहे की जगभरातील पर्यटक येथे या स्मारकस्थळी गर्दी करतील व त्यांच्यासाठी हे स्थळ एक सर्वमान्य असे प्रकाशाचे केंद्र बनेल.

रविवार दि.२६ एप्रिल रोजी बाबूजी महाराजांचा हा पुतळा प्रिय कमलेशभाईंच्या निगराणीखाली उभारण्यात आला. पुतळ्याची स्वतःचीच उंची ३० फूट आहे व ही खरोखरीच एक कलाकुसरीने परिपूर्ण अशी प्रतिमा आहे. प्रतिमा अतिशय अभिव्यंजक व धीरगंभीर दिसते व त्यावरील हातांनी घडवलेले बारकावे अतिशय हुबेहुब असे दिसतात. ही प्रतिमा पंचधातूंची बनली असून अस्सल धातूंचे सुमारे शंभर पत्रे चिकणमातीपासून बनवलेल्या साच्यांमधून काढून एकसंध अशी तयार केली गेली आहे. या पुतळ्याचे वजन १३ टन एवढे आहे.





## मे २०१५

### उन्नाव

लखनौ भंडाऱ्यानंतर कमलेशभाईंनी दि २ मे रोजी उन्नाव केंद्राला भेट देण्याचे ठरविले. ते सकाळी ११ च्या सुमारास निघून १२:३० पर्यंत तेथे पोहोचले (लखनौ पासून ७० कि.मी.). तेथील ध्यानकक्षामध्ये त्यांनी सत्संग संचालित केला. त्यांनी त्यानंतर 'गुरुदेवांसारखे कसे बनावे?' या प्रश्नावर आधारित एक भाषण दिले. "बाबूजी महाराजांनी एक पद्धत दिली आहे. मला ती सांगताना संकोच वाटतो. ज्या कोणाला गुरुदेवांचे गुण आत्मसात करावेसे वाटतात, त्याने मध्यरात्री १२ ते रात्री २ वाजेपर्यंत केव्हाही १५ ते २० मिनिटे ध्यानाला बसून प्रार्थनापूर्वक संकल्प करावा की, 'गुरुदेवांचे सर्व गुण माझ्या हृदयामध्ये येत आहेत'." ते पुढे म्हणाले की "जर तुम्ही हे करु शकत नसाल, तर तुम्ही स्वत:ला त्याबद्दल दोषी मानू नये. बाबूजींना ही पद्धत सांगायची नव्हती. अभ्यासींना आधीच साधनेच्या बऱ्याच गोष्टींचा भार आहे. त्यात आणखी एक ध्यान!" दुपारच्या जेवणानंतर काही काळ वामकुक्षी करुन ते लखनौ आश्रम येथे परतले.

### सितापूर

दि. ३ मे रोजी सकाळी ७:३० वाजता गुरुदेव सितापूर आश्रम येथे पोहोचले आणि त्यांनी सत्संग संचालित केला. त्यानंतर वृक्षारोपण केले व आश्रमामध्ये फेरफटका मारला. ते भोजनगृहाजवळ थांबले व अभ्यासींना त्यांनी न्याहरी वाढली.
सुमारे ९:०० वाजता ते लखनौला परतले. परतीच्या प्रवासामध्ये ते बऱ्याच गोष्टी बोलत होते.
"कोणावर टीका करून तुम्ही स्वत:ची किंमत कमी करुन घेऊ नका. त्यायोगे तुम्ही स्वत:लाच इजा पोहोचवाल. तुम्ही ज्याच्यावर टीका करीत आहात तो इथे नाही व त्याला त्याची काहीच झळ लागत नाही. परंतु तुम्ही स्वत:वर विषप्रयोग करीत आहात. या अशा तिरस्कार व नावडीमुळे जे प्रेम तुमच्या अंतर्यामी प्रसरण पावत होते, त्याचे काय झाले? ही गोष्ट त्या व्यक्तीबद्दल नाही, अशाने तुम्हीच मूळपदावर जात आहात."

दुपारी २ वाजता लखनौ आश्रमाच्या कुटीरासमोरील प्रांगणामध्ये जमलेल्या स्वयंसेवकांच्या समूहाला ते भेटले. त्यांच्याबरोबर हितगुज व थोडी थटटामस्करी झाली. या भेटीची सांगता एका सामूहिक छायाचित्राने झाली. सायंकाळी ६ वाजता मुख्य ध्यानगृहामध्ये त्यांनी सत्संग संचालित केला.

### दिल्ली

दि ४ मे रोजी, कमलेशभाई दिल्लीला पोहोचले. तिथे जाऊन लगेचच त्यांनी एका आश्रमाच्या प्रकल्पावर काम करण्यास चालू केले आणि प्रस्तावित आखणींचे अवलोकन केले. सायंकाळी ६ वाजता त्यांनी गुडगांव आश्रमामध्ये सत्संग संचालित केला. सत्संगानंतरच्या भाषणामध्ये त्यांनी नवीन इच्छुकांना ध्यान करण्यास आकर्षित कसे करावे या विषयाचा खुलासा केला. ते म्हणाले, "सर्वप्रथम व सर्वात महत्वाची बाब म्हणजे स्वत:ची नियमित साधना. आपल्या दैनंदिन व्यवहारामध्ये आपल्या आंतरिक निस्तब्धतेने, आंतरिक शांतीने, आंतरिक आनंदी अवस्थेने व आपल्या हृदयामधील त्या प्रेमाच्या खजिन्याद्वारे आपण स्वत:च संसर्गजन्य झाले पाहिजे. त्यामुळे आपण कोणाशीही काही बोलतो तेव्हा आपले विचार त्यांच्यापर्यंत पोहोचतात. हे एखाद्याला अत्यंत आपुलकीने स्पर्श करण्यासारखेच आहे. आपले विचार अतिशय प्रभावी असतात. आपण जेव्हा साधना करतो व ती आंतरिक प्रेमाची अवस्था अबाधित ठेवून या स्थितीसमवेत कार्य करतो, कशालाही स्पर्श करतो, कोणाकडेही पाहतो, काहीही ऐकतो, तेव्हा आपली आंतरिक प्रेमाची स्थिती आपण संक्रमित करत असलो पाहिजे. असा प्रयत्न जाणीवपूर्वक करा. संभाषणादरम्यान जाणीवपूर्वक प्रेमाचे संक्रमण करण्याचा प्रयत्न करा."

"स्वामी विवेकानंदांनी आपली इच्छा बाबूजी महाराजांसमोर व्यक्त केली होती की, 'लोकांनी आपली सहजमार्ग साधना पद्धती अंगिकारलीच पाहिजे हे काही अगत्याचे नाही. परंतु, प्रत्येक कुटुंबाला आपल्या अस्तित्वाची माहिती होणे महत्त्वाचे आहे. त्यांना जेव्हा केव्हा गरज भासेल, तेव्हा सहजमार्ग त्यांच्यासाठी आहे. आम्ही नेहमीच उपलब्ध आहोत."

रात्री उशीरा ११:३० वाजता त्यांच्या पुढच्या युरोपच्या दौऱ्यासाठी ते दिल्लीच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे रवाना झाले.





## युरोपचा दौरा

**दि. ५ ते २५ मे २०१५**

आदरणीय कमलेशभाईंच्या युरोप प्रवासाची सुरुवात त्यांच्या इटलीमधील मिलान शहराच्या भेटीने झाली. दि. ६ मे रोजी त्यांनी मिलान येथील नवीन ध्यानगृहाचे उद्घाटन केले व त्याच दिवशी अऑस्टा (इटली) या केंद्राला भेट दिली. नंतर त्यांनी स्वित्झरलॅंड येथील लौझान केंद्राकडे प्रस्थान केले व नवीन आश्रमात सत्संगाचे संचालन केले. त्यांनी फ्रान्स मधील मॉपेलिए व पेक्पिनिया केंद्राना भेटी दिल्या व स्पेन मधील बार्सिलोनाकडे प्रयाण केले. बार्सिलोना येथे 'हृदयानुभूती'चे सत्र आयोजित करण्यात आले होते व त्याचा सर्व उपस्थितांवर चांगलाच प्रभाव दिसून आला. ते सर्व सर्वात शेवटी आयोजित केलेल्या ध्यानासाठी थांबले होते तसेच त्यांनी साधना सुरु करण्याचेही ठरवले. कमलेशभाईंनी पोर्तूगालमधील लिस्बन केंद्राला भेट दिली व तेथून ते फ्रान्स येथील लियॉं येथे तीन दिवसीय 'हृदयानुभूती' चर्चासत्राचे संचालन करण्यासाठी रवाना झाले.

दि. १५ ते १७ मे दरम्यान झालेल्या या सत्रासाठी संपूर्ण युरोपमधून सुमारे २६०० अभ्यासी लियॉं येथे जमा झाले होते. या सत्रादरम्यान 'द कम्प्लिट वर्क्स ऑफ रामचंद्र – भाग ५' च्या संग्राह्य आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. नोव्हेंबर २०१४ रोजी मणपाक्कम येथे झालेल्या युवा चर्चासत्रादरम्यान कमलेशभाईंनी दिलेल्या भाषणाचे संकलन असणारे 'डिझायनिंग डेस्टिनी' या पुस्तकाची फ्रेंच आवृत्तीदेखिल सादर करण्यात आली. हे भाषांतर फ्रान्स व बेल्जियम येथील युवा अभ्यासींनी केले आहे. या मर्यादित आवृत्तीचे फ्रेंचमध्ये *Créer Notre Destinée* असे नामकरण करण्यात आले आहे.



या चर्चासत्रादरम्यान युवकवर्ग विविध सत्रांमध्ये सहभागी झाला होता. त्यामुळे त्यांना एकमेकांशी चर्चा करण्यास व विषयांवर चिंतन करण्यास वाव मिळाला. उपस्थित सर्वांसाठीच एकमेकांसमवेत बंध निर्माण करण्याची व आपल्या दृष्टिकोणावर सखोल मनन करुन अध्यात्मिक प्रगती करण्याची ही एक संधी होती. प्रथम सत्रादरम्यान कमलेशभाईंनी सहभागींशी संवाद साधला. कमलेशभाई व युवा उपस्थितांचे होणारे संभाषण हे अतिशय सुंदर व ओघवते होते, संपूर्ण सभागृह हास्यामध्ये व टाळ्यांच्या गजरामध्ये बुडून गेले.









जनतेसाठी हृदयानुभूतीची दोन खुली सत्रे आयोजित करण्यात आली होती. बाहेरील सुमारे १००० व्यक्तींची यासाठी उपस्थिती होती. दि. १७ रोजी सकाळी ७.३० च्या सत्संगानंतर कमलेशभाईंनी चार विवाह सम्पन्न केले. लियॉहून त्यांनी रोमानियामधील तिमिशुआरा येथे प्रस्थान केले.

दि. १८ मे रोजी सकाळी ७.३०च्या सत्संगानंतर तिमिशुआरा येथील दोन दिवसीय सत्राची औपचारिक सुरुवात झाली. प्रामुख्याने रोमानिया व काही प्रमाणात सर्बिया व मोल्डाविया येथून सुमारे २०० अभ्यासींनी यामध्ये भाग घेतला होता. तिमिशुआराहून व्हिएन्ना येथे जाताना कमलेशभाई हंगेरीमधील बुडापेस्ट येथे थांबले व स्थानिक अभ्यासींसाठी सत्संगाचे संचालन केले. हलक्या न्याहरीनंतर त्यांनी ऑस्ट्रियामधील व्हिएन्नाकडे प्रयाण केले. तेथे ते संध्याकाळी पोहोचले. दि. २१ मे रोजी तेथे एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी डेन्मार्कमधील व्रॅड्स सॅन्दे आश्रमाकडे प्रयाण केले.

दि. २२ मे रोजी व्रॅड्स येथे आयोजित सत्रामध्ये अभ्यासी अतिशय गहन अशा समारंभात बुडून गेले होते. यासाठी संपूर्ण युरोपमधून सुमारे १२०० अभ्यासी आले होते ज्यामध्ये काही जुने अभ्यासी होते तर बरेचसे नवीनही होते. दररोज तीन सत्संग होत असत. यानंतर या महत्त्वाच्या वेळी या पृथ्वीवरील आपल्या व आपल्या जाणिवांच्या उत्क्रांतीसंबंधी आपल्या कक्षा रुंदावणारी भाषणे होत असत.



दि. २३ रोजी ध्यानासाठी उभारलेल्या शामियान्यामध्ये सर्व अभ्यासींसाठी हृदयानुभूती संबंधी सादरीकरण करण्यात आले. स्थानिक अभ्यांगतांसाठी डॅनिश भाषेमध्ये हृदयानुभूती सत्राचे प्रायोगिक आयोजन करण्यात आले होते. सुमारे ४० जणांनी यावेळी उपस्थिती नोंदविली व त्यानंतर त्यांनी प्रथम सिटींग देखिल घेतले. रविवारी दुपारी असेच एक सत्र घेण्यात आले. संध्याकाळी ५ वा. सत्संगानंतर कमलेशभाईंनी ४ वर्षे ते १८ वर्षे वयाच्या मुलांसोबत वेळ व्यतित केला.



दि. २५ मे रोजी सत्राचा समारोप करण्यात आला व त्याचबरोबर कमलेशभाईंच्या युरोप प्रवासाचा देखिल समारोप झाला. कमलेशभाईंच्या युरोपप्रवासाचा संपूर्ण अहवाल अभ्यासी वार्तापत्रामध्ये खालील ठिकाणी उपलब्ध आहे.

https://www.sahajmarg.org/newsletter/sahaj-sandesh





## प्रशिक्षकांची चर्चासत्रे

**जबलपूर, मध्य प्रदेश**

दिनांक २६ मे ते ३० मे दरम्यान एकूण ६ विभागांमधील ( मध्य प्रदेश–८अ, मध्य प्रदेश –८ब, राजस्थान ७अ व ७ब, छत्तीसगढ आणि महाराष्ट्र) ८५ प्रशिक्षकांसाठी पाच दिवसांच्या चर्चासत्राचे जबलपूर येथील झोनल आश्रमात आयोजन करण्यात आले होते. कामाच्या नवीन तंत्रांचा वापर प्रशिक्षकांनी कशा प्रकारे करावा यावर हा कार्यक्रम आधारित होता आत्मपरीक्षण, सुसंवादाची तत्त्वे, हृदयाचे ऐकणे, चेतनायुक्त जीवनसरणी आणि विनम्रता असे अनेक विषय हृदयानुभूती, यु–कनेक्ट, दूर अंतरावरून द्यावयाचे सिटींग आणि प्रार्थनामय सूचना यांबरोबर समाविष्ट करण्यात आले होते.

सर्व प्रशिक्षकांनी आपापल्या केंद्रांमध्ये नवीन तंत्रांना अनुसरून समर्पणपूर्वक काम करण्याचा निग्रह केला.

**मेरठ, उत्तर प्रदेश**

दिनांक ३० आणि ३१ मे रोजी विभाग १२ अ (उत्तर प्रदेश–पश्चिम) साठी आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षकांच्या वार्षिक संमेलनास ७० प्रशिक्षकांनी उपस्थिती नोंदविली.

कार्यक्रमाची सुरूवात ‘प्रशिक्षक हा उत्कट अभ्यासी आहे’ या विषयावरील ध्यानाने झाली. उत्तम प्रकारे आखलेल्या या कार्यक्रमात प्रशिक्षकांना देण्यात आलेल्या नवीन अनुमतींसंदर्भात स्पष्टीकरण देण्यात आले. यानंतर हृदयानुभूती, यु–कनेक्ट, खुले सत्र व गृहमेळावे यांवर सादरीकरणे आणि प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. प्रेमपूर्वक प्रशासन, बंधुभाव, विनम्रता, अज्ञातपणा, एकोपा, प्रशिक्षकाची भूमिका, व्हिस्पर्सचे महत्व आणि मूल्य, चारित्र्य निर्माण इ. विषयांवर यावेळी चर्चा झाली. जीआयटीपी प्रशिक्षण कार्यक्रम, अभ्यासींना रीट्रीट केंद्रांना व आश्रमांना भेट देण्यास उद्युक्त करणे, क्रेस्ट केंद्रांना भेट देण्यास प्रोत्साहित करणे, हिशेब ठेवण्याचे प्रशिक्षण घेणे अशा इतरही अनेक गोष्टी यामध्ये समाविष्ट होत्या.

बंधू अशोककुमार गर्ग (विभागप्रमुख) यांनी त्यांच्या केंद्रांच्या भेटींचा अहवाल सादर करून सुधारणेविषयी सूचना दिल्या. यानंतर प्रशिक्षकांनी केंद्रांच्या प्रगतीसाठी आवश्यक गोष्टींविषयी काही प्रश्न, स्पष्टीकरणे व मुद्दे उपस्थित केले व यावर चर्चा झाली. समारोपाच्या वेळी प्रशिक्षकांना त्यांच्या भावना व्यक्त करण्याविषयी सांगण्यात आले.

## प्रशिक्षक उमेदवार कार्यक्रम,

**मणपाक्कम**

दि. २० ते २६ मेच्या दरम्यान प्रशिक्षक प्रशिक्षणार्थींची १० वी तुकडी प्रशिक्षण घेत होती. एकूण ६२ उमेदवार यामध्ये सहभागी झाले होते. यापैकी २० जण आधीच प्रशिक्षक बनले होते तर ४२ जणांना तयार करण्यात येत होते.

कमलेशभाई जरी तेथे शरीराने उपस्थित नव्हते तरी त्यांची उपस्थिती आणि त्यांचे मार्गदर्शन सतत जाणवत होते.

बंधू सी. राजगोपालन यांनी तयारीची सिटींग्स दिली आणि प्रश्नांची उत्तरेही दिली. यावेळी त्यांनी प्रशिक्षकांना त्यांच्या कार्याचे विविध पैलू समजावून सांगितले.

या सत्रात सुसंवाद, संवादाची तत्त्वे, साधनेप्रति भाव आणि प्रशिक्षकाचे कार्य, सहजमार्ग तत्त्वज्ञान, आध्यात्मिक स्थितीचे वाचन, विनम्रता, प्रशिक्षकांना देण्यात आलेल्या नवीन अनुज्ञा, अज्ञातपणे काम करणे आणि अर्थशून्यता, हृदयानुभूती, प्रार्थनामय सूचना इ. विषयांचा समावेश होता. ज्या प्रशिक्षकांना आधीच काम करण्याची परवानगी मिळालेली आहे त्यांच्या करिता विशेष सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

पू. गुरुदेवांनी म्हटल्याप्रमाणे या हाती घेतलेल्या पवित्र आणि उदात्त कार्यात बंधुभाव आणि कामाच्या उद्देश्यपूर्तीचा भाव जाणवत होता.





## यु–कनेक्ट

### औरंगाबाद , महाराष्ट्र

औरंगाबाद येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात २०१४–२०१५ या शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सत्रात स्वयंविकासाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विविध शाखांच्या पदवीपूर्व वर्षांमधील सुमारे ७२ विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला होता.

दि.२३ मे रोजी या कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी एका प्रशिक्षकांनी रिलॅक्सेशन आणि दहा मिनिटांच्या ध्यानाचे प्रात्यक्षिक दिले. विद्यार्थ्यांनी यात रस दाखविला आणि ते चर्चेमध्ये सहभागी झाले. यानंतर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रके वाटण्यात आली.

### इंदूर, मध्य प्रदेश

दि. १४ जून रोजी विभाग ८ अ मधील यु–कनेक्टच्या स्वयंसेवकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी विविध केंद्रांमधून सुमारे ५० स्वयंसेवक यात सहभागी झाले होते. इंदूर, भोपाळ, ग्वाल्हेर आणि विदिशा येथील ६ महाविद्यालयांमध्ये स्वयंविकास कार्यक्रम राबविण्यात आला. यापैकी ४ महाविद्यालयांमध्ये हा पूर्ण झाला असून २ महाविद्यालयांमध्ये सध्या चालू आहे. एकूण या कार्यक्रमात १८० विद्यार्थी सहभागी झाले होते. स्वयंसेवकांनी यावेळी त्यांना विद्यार्थ्यांसोबत आलेल्या अनुभवाचे कथन केले. त्यांच्या म्हणण्यानुसार या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनातील अत्यंत आवश्यक असणारा अध्यात्माचा अंतराळ भरून निघण्यास मदत झाली. श्री रामचंद्र मिशनच्या स्वयंसेवकांच्या नि:स्वार्थ कामामुळे ते भारावून गेले होते. बरेच विद्यार्थी यावेळी सिटींग घेण्यास प्रेरित झाले. स्वयंसेवकांचे गट तयार करणे, वक्तृत्वाचे व समन्वयाचे प्रशिक्षण देणे या विषयांबाबत त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचा थोडक्यात गोषवाराही स्वयंसेवकांना दाखविण्यात आला.

हरदा, उज्जैन आणि झाबुवा या केंद्रांमध्ये हा कार्यक्रम सुरु करण्याचा प्रस्ताव आहे. इंदूर आणि भोपाळ येथे देखील विद्यमान महाविद्यालयांसमवेत अजून काही नवीन महाविद्यालयांमधून या कार्यक्रमाची सुरुवात करण्याचे योजिले आहे.

### समन्वयक प्रशिक्षण कार्यक्रम, होसूर, तामिळनाडू (विभाग २अ)

दि. ३० आणि ३१ मे रोजी ७० अभ्यासींसाठी दोन दिवसांच्या समन्वयक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. झोन २अ, झोन २ब आणि कर्नाटकमधील अनेक केंद्रांतील अभ्यासींनी यात सहभाग घेतला होता. यात यु–कनेक्ट आणि स्वयंविकास यांची माहिती देण्यात आली. तसेच सर्व अभ्यासींना गटचर्चेमधे व सादरीकरणामध्ये उत्साहाने सहभागी करुन घेण्यात आले. एक विषय घेऊन काही जणांनी त्यावर व्याख्यान द्यावयाचे आणि इतरांनी महाविद्यालयीन विद्यार्थी बनून ते ऐकायचे अशी प्रतिरूप सत्रेही यावेळी झाली. त्यामुळे सर्वांना या कामाचे गांभीर्य लक्षात आले व महाविद्यालयांमध्ये व विश्वविद्यालयांमध्ये सत्रे संचालित करताना पुरेशा गंभीरतेने करण्याची आवश्यकता जाणवली. सरतेशेवटी २बी विभागाच्या प्रमुखांनी यु–कनेक्टच्या कामाची आखणी करून सर्वांना मार्गदर्शन केले. यु–कनेक्टच्या केंद्रीय निरीक्षकाच्या उपस्थितीत समन्वयक वारंवार एकमेकांस भेटून आपले कौशल्य वाढण्यासाठी प्रयत्नशील राहतील हेही यावेळी ठरविण्यात आले. जेव्हा पुरेशा प्रमाणात समन्वयाकांना प्रशिक्षण मिळून ते तयार होतील तेव्हा ते आपापल्या क्षेत्रातील विविध महाविद्यालयांमधून जाऊन स्वयंविकास कार्यक्रम राबवतील.



श्री राम चंद्र मिशन

एकोज इंडिया वार्तापत्र





## युवा कार्यक्रम

### विरुधनगर, तामिळनाडू, विभाग २ड

दि. २९ ते ३१ मे दरम्यान घेण्यात आलेल्या विभागीय स्तरावरील युवा चर्चासत्रामधे विभाग २ड मधील सुमारे ७३ अभ्यासींनी सहभाग घेतला.

युवकांचा उत्साह ओसंडून वाहत असल्याने विविध विषयांवर विचारांच्या आदान–प्रदानाची सत्रे खेळकर वातावरणात झाली. यामध्ये हृदयानुभूती, ध्येय, साधना, सेवा, आत्मनिरिक्षण आणि चारित्र्य या विषयांवर चर्चा झाली. चर्चेसमवेत स्वयंसेवी कामाचेही आयोजन करण्यात आले होते.

प्रत्येक दिवसाच्या शेवटच्या सत्रानंतर रात्रीच्या भोजनाआधी संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमाचा आढावा घेतला जाई. त्यामुळे दुसऱ्या दिवशीची तयारीही यातून होई. त्यामुळे सहाजिकच दुसऱ्या दिवशीची सत्रे परिपूर्ण होण्यास मदत होई.

पू. गुरूदेवांच्या ध्वनीचित्रफितीबरोबरच स्वामी विवेकानंदांच्या जीवनावर आधारित चित्रपटही यावेळी दाखविण्यात आला. चर्चासत्राच्या शेवटी गुरुदेवांनी अशी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आणि त्यांच्या चिरंतन मार्गदर्शनाबद्दल एक कृतज्ञतेचा भाव सर्वांमध्ये निर्माण झाला होता.

### वलसाड, गुजरात, विभाग ६ब

दि. १३ आणि १४ जून रोजी वलसाड येथील आश्रमामध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'इथे आणि आत्ता' या विभागीय स्तरावरील कार्यशाळेत ४३ युवा अभ्यासी सहभागी झाले होते. फेब्रुवारी महिन्यामध्ये वडोदरा आश्रमात झालेल्या कार्यशाळेचा हा दुसरा भाग होता. कार्यशाळेमध्ये अभिवृत्ति, हृदयानुभूती, स्वयंविश्लेषण, स्वयंसेवी कार्य, वेळेचे नियोजन आणि भंडारा इ. विषयांचा समावेश होता. सहभागी अभ्यासी यामध्ये अतिशय उत्साहाने सामील झाले होते. प्रार्थनामय सूचना आणि स्वत:च्या स्थितीची दैनंदिनी लिहिण्यातून निर्माण झालेली जाणीव यांच्या उपयोजनामध्ये सर्वजण व्यग्र होते. युवकांनी एक तासाचे स्वयंसेवी कार्य केले.

'साधना में डूबिये', 'काळाची गरज' 'दहा सूत्रे' आणि 'तेजोमय ५० वर्षे' ह्या ध्वनीचित्रफिती यावेळी दाखविण्यात आल्या.

सर्व सहभागी व्यक्तींसाठी ही एक महत्वाची पुढची पायरी होती. अध्यात्माच्या या साहसपूर्ण प्रवासामध्ये सर्वांनी योग्य रितीने साधना करण्याचा निर्धार केला आणि इथे आणि आत्ताच बदलण्याचा संकल्प केला.

### प्रसारमाध्यम कार्यशाळा, मुंबई

पनवेल येथील बाबूजी मेमोरियल आश्रमामध्ये झालेल्या १० दिवसांच्या कार्यशाळेत आठ युवा अभ्यासी सहभागी झाले होते. भविष्यामधे अभ्यासी मिशनच्या विविध माध्यम प्रकल्पांवर काम करू शकतील या उद्देशाने 'स्वत: करून पहा' या संकल्पनेवर आधारित या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रात्यक्षिक आणि पुस्तकी अशा दोन्ही प्रकारच्या माध्यमाशी निगडीत ज्ञानाचा समावेश होता. त्यांना विविध विषयांवर आधारीत प्रकल्प देण्यात आले. उदा. छायाचित्रण, चलचित्रण, एव्ही सिलेक्टरच्या सहाय्याने मुलाखतीचे चित्रीकरण, प्रकाशयोजना, दिग्दर्शकाची दृष्टी, डबिंग, आवाजाचे रेकॉर्डिंग इ. माध्यमातील व्यक्तींच्या धकाधकीच्या जीवनाला लक्षात घेऊन फिजिओथेरेपी आणि आहार तज्ज्ञांची दोन खास व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. सहभागी व्यक्तींचे अभिनय कौशल्य पाहण्यासाठी व त्यांना व्यावसायिकतेच्या पायरीवर नेण्यासाठी 'चवीची जाणीव– अंतरंगातील' असा प्रकल्प देण्यात आला होता. सगळ्या प्रकल्प आणि अभ्यासामुळे सर्वांना दिग्दर्शन, अभिनय, छायाचित्रण, संपादन, आणि ध्वनी–चित्रण यामध्ये एक दृष्यमान गोष्टीचा– सिनेमाचा अद्वितीय असा अनुभव मिळाला.



# क्षणचित्रे

**भिलवडा, राजस्थान**

सहजमार्गाच्या १० सूत्रांवर आधारित एक कार्यशाळा दि.७ जून रोजी ४३ अभ्यासींसाठी आयोजित करण्यात आली होती. गोष्टी आणि उदाहरणे यांच्या आधारे सूत्रांचे विस्तृत स्पष्टीकरण देण्यात आले. थोडक्यात सांगायचे तर अध्यात्माच्या खऱ्या साधकासाठी या १० सूत्रांचे अनुसरण करणे किती जरुरीचे आहे यावर भर देण्यात आला. प्रत्येक तत्वाच्या महत्वाचे सुस्पष्ट आकलन झाल्यामुळे अभ्यासींना लाभ झाला.





**हुबळी, कर्नाटक**

दि. १३ व १४ जूनला २ दिवसांचा 'मनन' नावाचा कार्यक्रम कन्नडमधून घेण्यात आला. हुबळी, धारवाड, बेलूर, नवानगर, कल्लूर आणि गुलबर्गा येथून सुमारे १५० अभ्यासी उपस्थित होते. संवादात्मक पद्धतीने सादरीकरणे वापरुन साधनेच्या विविध अंगाविषयी सखोलपणे सांगितले गेले. याचा फायदा झाला असे अभ्यासींना वाटले.



**झिरो, अरुणाचल प्रदेश**

दि. १७ ते १९ एप्रिल दरम्यान एक तीन दिवसांची निवासी जी.आय.टी.पी कार्यशाळा या आश्रमात घेण्यात आली. दैनंदिनी लिहिणे, ध्यान व सफाईचे मोड्युल यांचा त्यात समावेश होता. इटानगर, बोम्डिला, फांसिघाट, रागा, अनिनि, नहरलगुन, तेंगा, डुलुंग आणि उ.लखिमपुर व तिनसुखिया यांना या कार्यक्रमाचा फायदा झाला.

**खरगपूर, प. बंगाल**

दि. २० ते २२ एप्रिल रोजी केंद्रीय विद्यालय, खरगपूर येथील इयत्ता १०वीच्या ४ वर्गांतील सुमारे १५० विद्यार्थ्यांसाठी 'मूल्यशिक्षणाची ओळख' या विषयावर एक तीन दिवसांचा कार्यक्रम आयोजित केला गेला होता. 'आओ सिखे खेल खेलमें अच्छी अच्छी बाते' (खेळताखेळता काही मूल्ये शिका) हा या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू होता. कार्यक्रमाची सुरुवात २ मिनिटांच्या शांततेने आणि तणावमुक्तीच्या व्यायामप्रकाराने झाली. त्यानंतर मनोरंजनात्मक कार्यक्रम झाले. खूपच खेळीमेळीच्या वातावरणात त्यांना नम्रता, प्रेम, साहस, सच्चेपणा ,जबाबदारी आणि शिस्त या सर्व सहा प्रकारच्या मूळ मूल्यांची ओळख करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी लक्षपूर्वक ऐकले, सुसंवाद साधला आणि उत्साहाने सादरीकरणाला प्रतिसाद दिला. 'भारतातील थोर व्यक्ती' आणि 'वॉक द टॉक' या चित्रफितींची मुलांनी खूपच प्रशंसा केली. पूर्ण कार्यक्रम खूपच चैतन्यपूर्ण आणि आल्हाददायक वातावरणात संपन्न झाला. शाळेच्या अधिकाऱ्यांनी दिलेले सहकार्य वाखाणण्याजोगे होते.



## मुलांसाठी उन्हाळी शिबिरे

उन्हाळी सुटट्या जवळ येत असल्यामुळे, मुलांची केंद्रे आणि आश्रमातील इतर स्वयंसेवक आपापल्या आश्रमात उत्कंठावर्धक उन्हाळी शिबिरांचे नियोजन करण्यात गर्क झाले होते. मुलांना घरी असल्यासारखे वाटावे आणि त्याचबरोबर त्यांच्यात जीवनावश्यक मूल्ये तरल आणि मनोरंजक पद्धतीने रुजवून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा अशा पद्धतीने ही शिबिरे आयोजित करण्यात आली होती. मोठ्या संख्येनी मुले सहभागी झाल्याने शिबिरातील स्वयंसेवकांना सतत सतर्क राहवयास लागत होते. छोट्या गटातील मुले (वय ६–१०) बहुतांशी हस्तकला व रंगविण्याच्या कामात मग्न झाली होती. त्यामुळे त्यांना देवाण–घेवाण आणि एकमेकांना संभाळून घेणे यासारखी मूल्ये शिकण्याची संधी मिळाली. बहुतेक आश्रमांमध्ये मोठ्या गटातील मुलांसाठी (वय ११ ते १६) अध्यात्माशी संबधित विषय तसेच जीवनाचे सामाजिक व व्यावहारीक पैलू यांवर अधिक गंभीर अशी सत्रे झाली. मुलांना रोज सकाळी व्यायाम, रिलॅक्सेशन आणि विविध मजेशीर खेळ यांमध्ये गुंतवून ठेवण्यात आले. त्यामुळे ते दिवसभर उत्साही आणि कार्यक्षम राहिले. स्वयंसेवकांनी त्याग आणि प्रेमभावनेने प्रयत्नांची शर्थ केली. त्यामुळे मुले आनंद, एकोपा, मोकळेपणा आणि भविष्यात त्यांना मार्गदर्शक ठरणारी मूल्ये हृदयात घेवून परत जावू शकली. एकोज टीमला अहमदाबाद, अलाहाबाद, बेंगलोर, मुंबई आणि सितापूर केंद्रातून उन्हाळी वर्गाचे अहवाल मिळाले. या शिबिरांची काही क्षणचित्रे खाली दिलेली आहेत.















## 'हृदयानुभूति' सत्रे

आध्यात्मिक ओढ असणाऱ्यांसाठी 'हृदयानुभूति' हा सहज मार्ग प्रस्तुत करण्याचा एक उपक्रम आहे. यामध्ये सहज मार्गाच्या सर्वच बाबी एकाच वेळी आत्मसात करण्याऐवजी इच्छुकांच्या सोयीनुसार, त्यांच्या अनुभवानुसार त्यांना स्वीकारण्याचे स्वातंत्र्य दिले जाते. हृदयावर ध्यान करण्याबरोबरच हृदयानुभूतिमध्ये रिलॅक्सेशन टेक्निकची ओळख करून दिली जाते. याद्वारे मनाचा वापर करून शरीराला कशाप्रकारे विश्रांती देता येते व मनाचाच वापर ध्यानासाठी कसा केला जातो हे सोदाहरण दाखविले जाते. सहजमार्गाच्या 'साधा मार्ग' या अर्थानुरूप, सोप्या शब्दांमध्ये सहज मार्ग समजावून सांगण्यात येतो. उदाहरणार्थ: 'सत्संग' ऐवजी 'ध्यान'; 'आश्रम' ऐवजी 'ध्यान केंद्र'; 'प्रशिक्षक' ऐवजी 'मार्गदर्शक'; 'अभ्यासी' ऐवजी 'ध्यान करणारा'. आंतरिक भावनांना प्रतिसाद देऊन आतून येणाऱ्या स्फूर्तींना जाणण्यास शिकणे यावर 'हृदयानुभूति' आधारित आहे. हृदयावर ध्यान करून मनाद्वारे हृदयाला नियमित करण्याचा हा सराव आहे.

'हृदयानुभूति'ची सत्रे सर्व भारतभर व विदेशातही संचालित केली जात आहेत. काही वृत्ते व छायाचित्रे खाली देण्यात आली आहेत. या सर्व सत्रांमध्ये सहभागींसाठी हृदयानुभूति, रिलॅक्सेशन टेक्निक व ध्यान करण्यात आले.

### अजमेर, राजस्थान

दि २८ मे रोजी रामगंज येथिल जियालाल शिक्षक प्रशिक्षण केंद्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका तासाच्या सत्रामध्ये १००हून अधिक लोक सहभागी सहभागी झाले होते. अजमेरचे केंद्रप्रमुख बंधू भगवान सहाय यांनी युवकांच्या आध्यात्मिक दृष्टीकोनासमवेत संपूर्ण विकासाच्या गरजेवर भर दिला. त्यांच्या चैतन्याला सुयोग्य अशा आध्यात्मिक अभ्यासाकडे वळविण्याच्या आवश्यकतेविषयी ते बोलले.

### अल्वर, राजस्थान

दि. २३ मे रोजी लक्ष्मीदेवी अभियांत्रिकी व तंत्रप्रशिक्षण केंद्रामध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांसमवेत सुमारे १५० जण उपस्थित होते. सर्वच उपस्थितांनी या सत्रानंतर ध्यानाची सुरुवात करण्याची इच्छा दर्शविली.

### भीकणगाव, मध्यप्रदेश

इंदौरहून १५० किमी अंतरावर भीकणगाव हे एक नवीन केंद्र आहे. दि. १७ मे रोजी झालेल्या कार्यक्रमामध्ये सुमारे ७० इच्छुकांनी भाग घेतला व त्यानंतर १६ जणांनी सहजमार्ग स्वीकारला. भीकणगाव येथे आता नियमितपणे रविवारचा सत्संग संचालित केला जातो.

### पोलिस प्रशिक्षण केंद्र, भाऊरी, मध्यप्रदेश

दि. २२ एप्रिल ते २४ एप्रिल दरम्यान १९० पोलिस प्रशिक्षणार्थी व कर्मचाऱ्यांना ध्यानाची ओळख करून देण्यात आली. हे प्रशिक्षणार्थी या केंद्रातील दुसरी तुकडी होती ज्यामध्ये पोलिस उपनिरिक्षक, दलसेनापती, विशेष विभागाचे उपनिरिक्षक आणि क्यूडी शाखा हे सहभागी झाले होते. प्रशिक्षण केंद्रामध्येच रविवारचे सत्संग संचालित केले जातात. भोपाळच्या केंद्रप्रमुखांच्या सहयोगाने त्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये ध्यानाचा अंतर्भाव करण्याची योजना आखण्यात येत आहे.

### ठाणे, महाराष्ट्र

ठाण्याच्या वसंत विहार परिसरातील रहिवाशांसाठी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. वय वर्षे २० ते ७५ अशा विस्तृत वयोगटातील ७५ इच्छुकांनी यामध्ये भाग घेतला. सर्व जणांना








हृदयानुभूति पत्रक, रिलॅक्सेशन टेक्निकच्या मार्गदर्शक सूचना व ठाणे शहरातील सर्व प्रशिक्षकांचे संपर्क विवरण देण्यात आले.

**पालनपूर, गुजरात**

दि. १८ मे रोजी 'गुजरात पाणी पुरवठा आणि सांडपाणी निकास' मंडळाच्या पालनपूर येथील कार्यालयामधील सुमारे साठ कर्मचारीवृंद आणि कामगारांना बंधू अनिश (अहमदाबाद) यांनी ध्यानधारणेची ओळख करुन दिली. यावेळी जमलेली मंडळी ध्यानपध्दतीविषयी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी उत्सुक होती. यामधील काही जणांनी ध्यान सुरु करण्यामध्ये रस दाखवला आणि त्यासाठी त्यांनी स्थानिक प्रशिक्षकांचा संपर्क क्रमांक घेतला.

**पश्चिम राजस्थान**

पश्चिम राजस्थान (७–ए) येथे विविध ठिकाणी सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामधील बहुतेक सर्व सहभागींना येथे काहीतरी विशेष असे जाणवले जे केवळ लाभदायकच नव्हते, तर अंतर्मनाला आनंददायी करणारेदेखील होते. उत्सुक सहभागींनी त्यांना संपर्क करण्यासाठी आपली माहिती दिली आणि आता प्रशिक्षक त्यांना आपल्या ध्यान पद्धतीविषयी अवगत करण्याचे कार्य करत आहेत.

**जालोर**: पहिले सत्र दि.९ मे रोजी बी.एड. महाविद्यालयामधील सुमारे चौऱ्याहत्तर सहभागींसाठी झाले. दि.२० मे रोजी जिल्हा शिक्षण आणि अध्ययन संस्थेमधील सुमारे एकशे दहा सहभागींसाठी दुसरे सत्र झाले.

**पदमपुर**: श्री गंगानगर जिल्ह्यामधील पदमपूर येथे दि.३ जून रोजी शहीद कॅप्टन नवज्योत सिंग सिध्दू उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये सुमारे दोनशे शिक्षकांसाठी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**सुजनगड**: दि.१७ मे रोजी बंधू ताराचंद (सुजनगड केन्द्र) यांनी एका सत्रामध्ये सहभागी होण्यासाठी त्यांचे मित्र, आप्त आणि सहकारी अशा सुमारे सत्तर जणांना आमंत्रित केले होते. बंधू अनिल (जोधपुर) आणि ताराचंद हे या सत्राचे समन्वयक होते. यामधील सोळा मुमुक्षूंनी साधनेला प्रारंभ केला आहे.

**सिरोही**: दि.२२ मे रोजी सिरोही येथील भटकड विद्यालयामध्ये सुमारे एकोणीस मुमुक्षूंसाठी सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

**त्रिची, तामिळनाडू**

ऑक्टोबर २०१४ पासुन त्रिची येथील प्रशिक्षकांनी अभ्यासींच्या घरांमध्ये घरगुती मेळावे घेण्यास प्रारंभ केला. शेजाऱ्यांमध्ये मिशनबद्दल जागरुकता आणणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. मार्च २०१५ पर्यंत अशी चौदा गृह संमेलने आणि तीन खुली सत्रे संपन्न झालेली होती. एप्रिल ते मे दरम्यान पाच गृह संमेलने आणि दोन खुली सत्रे झाली.

**बेंगलोर, कर्नाटक**

संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय योगदिनाप्रीत्यर्थ दि.२१ जून रोजी शहरामधील सुमारे सोळा ठिकाणी खुल्या सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. अधिकाधिक लोकांना याची माहिती मिळावी यासाठी प्रचारफलक, भित्तीपत्रके आणि आमंत्रणे वितरणाच्या कार्यामध्ये समन्वय साधण्याचे काम स्वयंसेवकांनी केले. तीनही आश्रमांमध्ये बऱ्याच संख्येने लोक उपस्थित होते. इतर ठिकाणी देखील स्थानिक लोकांनी हजेरी लावली होती. संपूर्ण शहरामधून या सत्रांमध्ये एकूण सुमारे तीनशे लोक सहभागी झाले, त्यापैकी सुमारे दोनशे जण आता साधनेला प्रारंभ करणार आहेत.




## योगाश्रम देहरादून, उत्तराखंड प्रकाशाचे केंद्र





जून एकोणीसशे एकोणनव्वद यावर्षी फक्त सहा नियमित अभ्यासींसह एका अभ्यासीच्या निवासस्थानी रविवारच्या सत्संगाला प्रारंभ झाला. हळूहळू या संख्येमध्ये वाढ होण्यास सुरुवात झाली आणि २०००–२००१ सालापासून आश्रमासाठी जागेचा शोध सुरु झाला.

### गुरुदेवांच्या भेटी

१९९५ ते २००५ दरम्यान आदरणीय चारीजी महाराजांनी देहरादून येथे बऱ्याच वेळा भेट दिली. २००१ मध्ये त्यांच्या एका भेटीदरम्यान त्यांना आश्रमासाठी तीन संभाव्य (उपलब्ध) जागा दाखविण्यात आल्या आणि यापैकी पोंढा येथील जागेला त्यांनी पसंती दर्शवली.

दि. १९ नोव्हेंबर २००३ मध्ये गुरुदेवांच्या हस्ते पायाभरणी झाली आणि त्यानंतर लगेचच आश्रमाच्या बांधकामाला सुरुवात झाली. आश्रमाचे बांधकाम सुरु असताना दि. ११ जून २००४ रोजी जागेची पाहणी करण्यासाठी त्यांनी या जागेला भेट दिली. त्यानंतर दि.७ फेब्रुवारी २००५ रोजी चारीजींनी या आश्रमाचे उदघाटन केले आणि या आश्रमाला ‘योगाश्रम’ हे नाव देण्यासाठी त्यांनी संमती दिली.

देहरादूनमधील पोंढा या एका शांत गावामध्ये १.०७ एकर जागेवर हा आश्रम स्थित आहे. हे गाव, शहराचा मध्यबिंदू आणि रेल्वेस्थानक दोन्ही पासून सुमारे पंधरा कि.मी अंतरावर आहे. देहरादूनला हिमाचल प्रदेशासोबत जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ७२ पासून ३



कि.मी अंतरावर हा आश्रम वसलेला आहे. पेट्रोलियम विश्वविद्यालायाकडे जाणारा मार्ग आश्रमासमोरुन जातो आणि हाच मार्ग पुढे आश्रमाला शहराशी जोडतो.

### सुविधा

या आश्रमामध्ये एक टुमदार ध्यानकक्ष (४० बाय ६० फूटांचा) आहे. या कक्षालगत एक सात फूट रुंद व्हरांडा आहे. हा आश्रम ‘प्रक्षेपक (प्रोजेक्टर), प्रतिपरीवर्तक, (इनव्हर्टर) आणि ध्वनी विस्तार प्रणाली (पी.ए.सिस्टीम)’ या उपकरणांनी युक्त आहे. जिन्याखालील जागा आणि दिवाणखाणाच्या मोकळ्या व्हरांड्यामध्ये एक छोटे वाचनालय आहे. ध्यानगृहासमोरील हिरवळ आणि आश्रमामध्ये पसरलेली झाडी त्याच्या सौंदर्यामध्ये अजूनच भर घालते. आश्रमामध्ये जोडलेल्या दोन खोल्यांचे मोठे स्वयंपाकघर आणि त्यालगतच ३० बाय ३० फूटांचा एक भोजनकक्ष आहे. येथे दर रविवारी सत्संगानंतर अभ्यासींनी स्वत: बनवलेली न्याहरी दिली जाते. प्रसाधनगृह, कोठीघर आणि चौकीदाराच्या खोलीसह सर्व सुविधांनी आश्रम परिपूर्ण आहे. वाहने लावण्यासाठी एक छोटा वाहनतळदेखील येथे आहे. आश्रमामध्ये पाणी पुरवठ्यासाठी कूपनलीकेचा वापर होतो. या कूपनलीकेचे पाणी पिण्यायोग्य आणि आश्रमासाठी पुरेसे आहे.

### उपक्रम

आश्रमामधील कार्यक्रम महिन्याच्या पहिल्या रविवारी दुपारच्या भोजनापर्यंत चालतात. जवळच असलेल्या विकासनगर आणि जॉली ग्रॅन्ट या उपकेंद्रांमधील अभ्यासी देखील पहिल्या रविवारी या कार्यक्र -मांमध्ये सहभागी होतात. आपल्या पूज्य गुरुदेवांचे जन्मदिवस येथे अतिशय उत्साहाने साजरे केले जातात. आखिल भारतीय निबंध स्पर्धेमध्ये देहरादून मधील विविध शिक्षण संस्थामधून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ दरवर्षी या आश्रमामध्ये होतो.

To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2015 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. “Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.